# खडीसाखरेचा वेल

सौ. विजया जहागीरदार

म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय बा.वा.
दा. क्र. ४८६



BVBK-0[illegible]0486

# खडीसाखरेचे वेल

## सौ. विजया जहागीरदार

म. प्रं. सं. ठाणें, वाचनालय शाखा.

वा.क्र. ४८६ दिनांक

विषय बा.वा. क्र.

BVBK-0000486

अनंत प्रकाशन, पुणे

मूल्य : दोन रुपये

खडीसाखरेच्या
चालत्या, बोलत्या
फुलत्या, फळांसाठी
खडीसाखरेचे वेल – सजविले तुम्हांसाठी
माझे बालपण पुनः – आठविले तुम्हासाठी
तेव्हां वाटले, दाटले – लिहिले ते पानोपानी
मोठ्यांनाही सांगितली – छोट्यांची ही प्रश्नगाणी
किशोर – किशोरींनो – हे सारे तुम्हांसाठी


प्रकाशिका
सौ. अर्चना अनंत टोळ
अनंत प्रकाशन
४३३/३ सारस्वत कॉलनी,
पुणे ४११००१

प्रथमावृत्ती
जानेवारी १९७९

किंमत दोन रुपये


मुद्रक
ले. कर्नल वि. वा. जोशी
सकाळ छापखाना
५९५ बुधवार,
पुणे ४११००२

सजावट, मांडणी
ल. म. कडू



# आजीचे घर

मज आठवते आजीचे घर – वेल पसरले कौलारावर ।।
चिकणे अंगण अन् वृंदावन – तुळशीपाशी पणती मिण्मिण ।।
आंब्यांची घनदाट सावली – जास्वंदी, प्राजक्त, सायली ।।
जाई, चंपक, बकुळ, शेवगा – लपाछपीला केली जागा ।।
झुले चढविले झोपाळ्यावर – माळ्यावरती सजले घरकुल ।।
हुतुतू, खो खो, आटयापाटया – सुरपारंब्या, गंडे, गोटया ।।
माजघरातील चटईवरती – किती रंगल्या गोष्टी राती ।।
जादू, राक्षस, पऱ्या भेटल्या – राजकन्यका खऱ्या वाटल्या ।।
आता इथे पण रडू दाटते – आज अजोबा तिथे एकटे ।।
वाटे धावत जावे तिथवर – मज आठवते आजीचे घर ।।




# पूजा ?

विचारू का एक आई—रागावशी काय अशी ।
अशी पूजा देवांना या—आवडते सांग कशी ?
कडाक्याच्या थंडीतही—आंघोळीला थंड पाणी ।
तेल नाही, साबू नाही—पंचा देत नाही कोणी ।
राम, कृष्ण, शंभू, देवी—विठोबा नि रखुमाई ।
सारे एका ठिकाणीच ?—इश्य इश्य, ई ग बाई !
बिचच्यारांची आंघोळही—एवढ्याश्या ताम्हनात ।
दाटीवाटी, जागेसाठी—पाणी केसात कानात ।
का ग त्यांच्या अंगावर—दही, दूध, मध, तूप ।
वर पाणी, पळीभर—तरी सारे चूप चूप ।
त्याच त्याच, रुमालाला—पूसतेस खसा खसा ।
तेलकट तूप मध—निघतो का, कधी असा ?
हळदी-कुंकू भसाभसा—वर बुक्का कुट्ट काळा ।
नाक कुठे, डोळे कुठे—कुठे देसी गंध टिळा ?
मुकाट्याने तरी त्यांच्या—देवघरामध्ये रांगा ।
फणी नाही, भांग नाही—नाही गडबड दंगा ।
पदरात खुसुखुसु—काय हसतेस आई ?
नीट पूजा कर जरा—कितीदा मी सांगू बाई ?
आरशाच्या पेटीमध्ये—त्यांना पाहू दे की तोंड !
तेच तुला सांगतील—पूजा आहे की ही सोंग ?
का ग पुन्हा रागावते ?—म्हणे 'अक्कल कळली'. .
लोणीसाखर कशाला—माझ्या तोंडात कोंबली ? ॥

# बाळा खुदखुद हसवी कोण ?

चिव चिव चिमणी, गुण गुण गाणे ।
भुर भुर जाते, येते कोण ॥
कण कण काडी, सुत सुत जोडी ।
फांदीत घरटे बांधी कोण ॥
टप टप टिपते, कण कण दाणे ।
चोचीत धरुन नेते कोण ? ॥
इवल्या इवल्या, चोचीत कवळच्या ।
दाणापाणी घाले कोण ॥
वण वण फिरते, टुण टुण चालते ।
बाळा खुद खुद हसवी कोण ॥
मम् मम् रंगे, बाळासंगे ।
अंगत पंगत करते कोण ? ॥
चिव चिव चिमणी, गुणगुण गाणे ।
माझे अंगण सजवी कोण ॥




# हा हा हा कळले...

सांग आई कसे, तरंगती तारे ? ।
सांग ना ग आई, कसे येते वारे ? ।
आभाळाच्या रानी, चांदण्यांच्या गाई ?
चांदोबा गुराखी, झाला का ग आई ?
आणी एक हंडा, गाईच्या दुधाचा ?
की हा चंद्रचेंडू, देवाच्या मुलांचा ?
किंवा ही चांदीची, चंद्रकुंडी छान ?
दारी चांदण्यांच्या, वेलीची कमान ?
आणी गुंफावया, हार तारकांचा ।
गुंडाळला बिडा, जरीच्या तारांचा ?
आई आज काय, देवांची दिवाळी ?
चंद्राचे झुंबर, दिव्यांच्या या ओळी ?
हा हा हा कळले, आरास कशाची ।
देवाच्या बाळाच्या, वाढदिवसाची ॥

# पतंग

झोकात निघाला स्वारीवर....
पतंग चालला वर वर वर ....
पप्या जसा पळतो –
शेपटीशी खेळतो –
गोल गोल वळतो – गर गर गर ॥ १ ॥
तसा जरा फिरतो
तरी वर चढतो
दोर चाक ओढतो – सर सर सर ॥ २ ॥
ढगामधे शिरतो –
पक्ष्यांना धरतो –
वाऱ्यात धावतो – भर भर भर ॥ ३ ॥
कांचदोर पेलतो –
तरी राजा उडतो – कर कर कर
वावड्या कापतो – चर चर चर ॥ ४ ॥
झोकात निघाला स्वारीवर ।
पतंग गेलाय वर वर वर ॥



# गोप्याची गंमत

भोवळ आली क्षणभर–सारे फिरले गरगर ।।
गोप्याच्या शेतावर–खाली छप्पर वर घर ।।
बकऱ्या झाडावरती–पाखरं पारावरती ।।
आकाश तळ्यात बुडले–तळे नभात उडले ।।
तारे लोळती ढिगात–मासे खेळती ढगात ।।
पोपट घुसले खोलीत–माणसं बसली ढोलीत ।।
उंदीर फिरती खळ्यात–बैल शिरती बिळात ।।
गुर्जी करतात खोडी–गोप्या काढतो छडी ।।
गोपू म्हणे काय असं ?–जग तरी उलटलं कसं ? ।।
तोच ताई हंबरली–दांत विचकून म्हणाली ।।
या हो गंमत या या–उलटं जग बघा या ।।
भवती जमलं सारं घर–हसून घेतलं डोक्यावर ।।
झोपाळू हो झोपाळू–उठा उठा गोपाळू ।।
बघा तुमचं झालं काय–खाली डोकं वर पाय ।।

# खडीसाखरेचा वेल

माझ्या नव्या बाहुलीचे–असे गोरे गोरे अंग ।
जणू अंगात खेळतो–खडीसाखरेचा रंग ।।

माझ्या गोऱ्या बाहुलीचे–असे गुलुगुलु गाल ।
कुणी विणून ठेवली–सायसाखरेची शाल ।।

माझ्या गोजिरीचे बोल–झाल्या कवितेच्या ओळी ।
कुणी लाविल्या ओठात–खडीसाखरेच्या वेली ।।

साखरेच्या बाहुलीच्या–हातापायात साखर ।
तिच्या शब्दाशब्दावर–जाईजुइची पाखरं ।।



# असं कसं असतं हो ?

अस्से कसे असते हो, मोठ्यांचे वागणे ?
एकदा एक बोलणे, अन् एकदा एक बोलणे ?
अभ्यास केला तर म्हणतात, 'पुस्तकातला किडा'।
खेळायला गेलो की म्हणतात, 'परीक्षेत रडा'।
लौकर उठलो तर म्हणतील, 'नीज अजून थोडा'।
उशिरा उठलो तर लागलीच, 'पसरलाय घोडा'॥
असे कसे असते हो..

एकदा सांगतील, 'बाबांनो, खरे खरेऽ बोला'।
खरे सांगताच म्हणतील, 'निर्लज्ज मेला'।
काम केले तर लागलीच, 'चंदू हुशार झाला'।
चुकले जरा कुठे तर मग, 'चंदू वाया गेला'॥
असे कसे असते हो..

एकदा म्हणायचे, 'जरा दया करायला शीक'।
केली की म्हणायचे, 'बाबा, लावशील मला भीक'।
मी कुणाला ठोकून काढले, की मीच ठरतो चिडकट।
मला कुणी मारले तरी, मीच पुन्हा शेळपट॥
असे कसे असते हो...

सांगतो तसे दाखले मी मित्रांच्या घरचे।
वस्कन् म्हणतात, नको सांगु, कौतुक दुसऱ्यांचे।
'शेजारच्या' बाळूचा मात्र, पुळका सारखा सारखा।
मला आपले म्हणत रहायचे, 'त्याचे जरा..शेण खा'॥
असे कसे असते हो..

धीटपणे बोलताच, म्हणतील, 'चुरचुर करतेय् तोंड'।
गप बसावे तर लागलीच म्हणतात, 'लाजरेच आहे सोंग'
कधी आजारी पडलो की मग, तेव्हा मात्र म्हणतात।
'चंदू आमचा गुणाचा हो' एवढेच खरे बोलतात॥
असे कसे असते हो..

# आश्चर्य

पोट दुखो, पाठ दुखो, हात दुखो, मान ।
डोकं दुखो, पाय दुखो, नाक दुखो, कान ।।
काही झालं, तरी आपलं, औषध पोटात घ्यायचं ? ।
औषधाला कसं कळतं, कुठल्या गल्लीत जायचं ? ।।

जिथे दुखतं, तिथे कसं, हे औषध पोचतं ?
उजेड नाही, दिवा नाही, त्याला कसं दिसतं ?
हातगल्ली, पायगल्ली, पाठीचं पठार ।
छातीमधला मोठा चौक, पोटाचा उतार ।

फासळ्यांच्या बोळामधून, इकडेतिकडे वाटा ।
औषधाला कसं कळतं, कुठून जातो फाटा ? ।।
लालहिरवे दिवे नाहीत, नाही पाटी, खुणा !
पोलीसदादा कुठेच नसतो, वाटा पुसतं कुणा ? ।।

आई, असं वाटतं की, इतकं लहान व्हावं ।
गोळीबरोबर पोटात जाऊन, सारं बघून यावं ।।
आईनं गप्कन धरलं, म्हणे, बरी आठवण केली ।
आज तुझी आहेच राजा, 'एरंडेल' ची पाळी ।।



# रात्रीची शाळा

बारा खेडुत केले गोळा
गोटचा घेतो रात्री शाळा
अक्षर, वाक्ये, भरल्यात वह्या
घोटुन घोटुन कोरल्या सह्या
पाढे, हिशोब, शिकले खूप
गोटचालाही म्हणती 'चूप'
बारा खेडुत हुशार झाले
ते पण आता 'मास्तर' केले
तेरा मास्तर, तेरा शाळा
हजार खेडुत झाले गोळा
घेऊन बसले पेन्सिल पाटचा
म्हणती "जय जय, जय जय गोटचा"
छातीवरचे 'पदक' मिरवित
गोटचा फिरतो छडी फिरवित
सारे खेडुत केले गोळा
गोटचा घेतो रात्री शाळा

# पाऊस

धूम धूम धडाड – खडखड खडाड – घन घन गर्जे वरी ।
तड तड तडाड – कड कड कडाड – कड कडते अंबरी ॥ १

खण खण खणाण – दण दण दणाण – कोसळताती सरी ।
सण सण सुसाट – फण फण पिसाट – वारा खोड्या करी ॥ २

थड थड थडाड – फड फड फडाड – खड खड कौलावरी ।
टप टप टपाप – पडती अपाप – थेंबांच्या वळसरी ॥ ३

सळ सळ सळाळ – खळ खळ खळाळ – लाटालाटांवरी ।
चट चट चटाट – पट पट मुकाट – गुरे वासरे घरी ॥ ४

त्रेधा तिरपिट – करतो खटनट – पाऊस वाटेवरी ।
गर गरगरून – नभ ये भरून – धड धड धडके उरी ॥ ५
धड धड धडके उरी ॥




# अंक आणि गणित

अंक म्हणे ऐका एका
चला 'लिपी' कडे जाऊ ।
पुरे झाल्या कटकटी
हिंडू, खेळू, मग येऊ ॥
ताठ छाती उंचावून
ऐटीत तिथे पोचले ।
तोच दिसले मास्तर
सारे 'लिपी'त लपले ॥
दोन 'श' च्या पायामागे
एक झाला 'भ' ची काठी ।
'प' च्या पाटी पोठी पांच
तीन आले 'अ' च्या ओटी ॥
सहा घुसे 'घ' च्या घरी
सात 'छ' च्या छत्रीमधे ।
साताच्याही पायावर
आठ छुपा छपे तिथे ॥

EVTK-0490486

नऊ धरतो 'ध' चे ध्यान
शून्य 'क' च्या कुशी गेले ।
कडा कडा छडा घेत
मास्तरच तिथे आले ।।
चार चोहोकडे फिरे
त्याला मिळेना आसन ।
घाई घाई त्याने केले
'श्री' च्या मागे शीर्षासन ।
सारेच खो-खो हसले
मास्तरांनी पकडले ।
खड् कीच् टोच् त्यांना
फळ्यावर जखडले ।।
तेव्हापासुन सुरू हा
गणिताचा हाहा:कार ।
हिशोब, बेरीज पाढे
गुणाकार भागाकार ।।



# सरींचं देणं ।।

देवाच्या दारात,आक्रीत घडलं। इंद्राचं धनुष्य,काड्कन मोडलं ।।
रंगांचे ओघळ, सरींनी झेलले । विजेनं सरींशी, भांडुन घेतलं ।।
भ्यायल्या लपल्या, ढगांच्या पोटात।फोफशा ढगांना,विजेनं घेरलं।।
तोच कशातरी,निसटल्या सरी।" येऊ कारे आंत?",फुलांना पुसलं
"सरी बाई सरी,या आमच्या घरी।भाग्यच आमचं"फुलांनी म्हटलं
तेव्हा सारी फुलं, पांढरीच होती । कुणीच नव्हतं, रंगात रंगलं।।
"कारे बाबा असे,तुम्ही सखे सुके।थांबा,तुम्हा देते,रंगांचं झबलं।।
मिटा बरं डोळे", साऱ्यांनी मिटले।सातरंगी पाणी,जादूनं फेकलं।।
वहाव्वा वहाव्वा,रंगाची कमाल । फुलांचं रुपडं,रंगात न्हायलं।।
धोतरा,मोगरा,जाई,जुई, बूच । आले घरी त्यांना, रडूच फुटलं ।।
सरी म्हणे,"फिरा,गावभर फिरा । उनाडांना बरं, शासन घडलं"।।

